

891.464
साने/खोले
80665

891.464
साने / खोले
80665

# साने गुरुजींचे निवडक निबंध

संपादक : विलास खोले

S.B.E.S. ARTS & COMMERCE COLLEGE LIBRARY
ACC NO
DEGREE COLLEGE
AURANGABAD

# म नो ग त

साने गुरुजी यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या वेचक निबंधांचे एक संपादन करावे असे माझ्या मनात आले. गुरुजींच्या साहित्यात समकालीन अंश बराच असला तरी त्यांच्या विचारात आजही टिकून राहिलेला व पुढेही टिकून राहील असा भाग कमी नाही. दीर्घकाळ चिंतनास उपयोगी पडतील अशा विचारांची सोबत करणारे बारा निबंध येथे एकत्रित दिले आहेत. शेवटी उपलब्ध असणाऱ्या सर्व निबंधांची आशयनिर्देशात्मक सूची दिली आहे. तीवरून साने गुरुजींच्या एकंदर निबंधवाङ्मयाचे स्वरूप ध्यानात येण्यास साहाय्य होईल अशी आशा आहे. त्यांच्या 'कला म्हणजे काय?' या पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या निमित्ताने १९४५ च्या सुमारास एक वाङ्मयीन वादळ झाले होते. त्याचा परिचय घडावा या दृष्टीने आचार्य स. ज. भागवत, श्री. के. क्षीरसागर व ना. सी. फडके यांच्या प्रतिपादनातील महत्त्वाचे भाग येथे मुद्दाम दिले आहेत. दिवसेंदिवस हे लेखन सर्व वाचकांना उपलब्ध होणे कठीण होते आहे असा अनुभव आला. त्यामुळे मुद्दाम हा उपक्रम केला आहे.

निबंधकार साने गुरुजींचा यथायोग्य परिचय व्हायचा तर त्यांच्या चरित्राची रूपरेषा ठाऊक हवी. यासाठी आरंभी गुरुजींचे अल्प चरित्र आणि जीवनपट दिला आहे. बालपणी मला साने गुरुजींच्या साहित्यामुळेच वाचनाची गोडी लागली. प्रस्तुत निबंधसंग्रह सिद्ध करण्यामागे त्यांचे हे ऋण अल्पांशाने तरी फिटावे अशी इच्छा आहे. सोमवार पेठेतील ज्या गाडगे महाराज वाचनालयात १९५४ ते ५६ या कालावधीत साने गुरुजींची पुस्तके मला वाचता आली त्या वाचनालयालाच हे पुस्तक अर्पण केले आहे.

हा निबंधसंग्रह सिद्ध होताना अनेकांचे साहाय्य झाले. प्रा. डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी साहित्य अकादमीच्या साने गुरुजी चर्चासत्रात गुरुजींच्या निबंधांवर एक निबंध वाचावयास सांगितला, त्यात या पुस्तकाचे बीज आहे. आज साने गुरुजींचे समग्र साहित्य

एका ठिकाणी मिळत नाही. या संग्रहासाठी आवश्यक असणारी पुस्तके मिळविताना डॉ. सुरेश चुनेकर, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रकाश भातंब्रेकर, डॉ. अनंत देशमुख, प्रा. अरुणा दुभाषी, गौरी नामजोशी, सुवर्णा निंबाळकर यांची मला विशेष मदत झाली. प्रा. जगन्नाथ नाईक यांच्याशी केलेली चर्चा पुस्तकाला आकार येण्यासाठी लाभदायी ठरली. या पुस्तकाचे पहिले स्वागत प्रा. ग. प्र. प्रधान यांनी केले. त्यामुळे आनंद झाला. या सर्वांचा मी ऋणी आहे.

प्रकाशक अरुण पारगावकर यांनी या पुस्तकाबाबत दाखवलेला उत्साह संकल्पपूर्तीसाठी प्रेरक ठरला. अन्यथा माझ्या हातून काम पुरे होण्याची शक्यता जवळजवळ मावळलीच होती. सुंदर संगणकीय अक्षररचना व प्रतिरूप मुद्रणाच्या दृष्टीने टाइपो-आर्टस् व संजीव मुद्रणालय यांचेही सहकार्य लाभले.

वाचक या संपादनाचे स्वागत करतील असा भरवसा वाटतो.

५ श्रीकृष्ण अपार्टमेंटस्,
३४९ सोमवार पेठ, पुणे ४११ ०११

- विलास खोले

भारतीय संस्कृतीचे नितांत सुंदर चित्र साने गुरुजींनी रेखाटले आहे. आपल्या प्राचीन परंपरेतील उदात्त विचारांचे आचरण न करता आपण संकुचित स्वार्थासाठी समाजात भेदाच्या भिंती निर्माण केल्या, याबद्दल साने गुरुजींच्या मनाला तीव्र वेदना होत. या निवडक निबंधांच्या संग्रहातून साने गुरुजींच्या विचारांतील आदर्शांबद्दलची ओढ आणि विषमतेबद्दलचा संताप उत्कटतेने व्यक्त झाला आहे. कला जीवनाभिमुख असावी, सत्य आणि शिव यांपासून सौंदर्य वेगळे होऊ नये, हा साने गुरुजींचा कलेबद्दलचा विचार मांडणारा निबंध अत्यंत उद्‌बोधक आहे. चिंतनपर निबंधांच्या या संग्रहातून साने गुरुजींच्या विशाल विचारक्षितिजाचे दर्शन घडते.

प्रा. विलास खोले यांनी केलेले प्रस्तुत संपादन वैशिष्ट्यपूर्ण आहे. साने गुरुजींचे अल्प चरित्र, त्यांचा जीवनपट, त्यांच्या निबंधाचे विविध पैलू स्पष्ट करणारा 'निबंधकार साने गुरुजी' हा प्रस्तावनालेख आणि 'कला म्हणजे काय?'च्या निमित्ताने निर्माण झालेल्या वाङ्मयीन वादळाचे समालोचन यांमुळे हा निबंधसंग्रह संग्राह्य झाला आहे. साने गुरुजी यांच्या उपलब्ध असणाऱ्या समग्र निबंधांच्या आशयनिर्देशात्मक सूचीमुळे तर प्रा. खोले यांच्या या संपादनास संपन्नता लाभली आहे.

साने गुरुजी जन्मशताब्दी वर्षात प्रसिद्ध होणाऱ्या या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

—प्रा. ग. प्र. प्रधान

प्रतिमा प्रकाशन